# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
# दिनांक ०९.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०८/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा—या १११ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे विरूध्द ८०,२५०/— रू.दंड वसुल करण्यात आला.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०८/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करून ३.४२ लिटर दारू असा एकुण १,३३०/— रू.कि.चा अवैध दारू साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारू बंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास तपास करण्यात येत आहेत.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणा—या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.०८/१०/२०२२ रोजी जुगार कायदयाअंतर्गत पोस्टे औंढा ना. ०१,हटटा ०१ असे एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुण आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचे कडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २,८९०/—रू.माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.